**Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies,**
*Online ISSN 2278-8808, SJIF 2019 = 6.380, www.srjis.com*
*PEER REVIEWED & REFEREED JOURNAL, JAN-FEB, 2020, VOL- 7/57*

# टेलिव्हिजन : समाजप्रबोधनाचे एक प्रभावी माध्यम

## (निळू दामले यांच्या 'टेली - वर्तन : भारतीय संस्कृतीवर टेलिव्हिजनचा परिणाम' या ग्रंथाविषयी)

**प्रा. किरणकुमार कवठेकर, Ph. D.**

*सहयोगी प्राध्यापक, मराठी विभाग, डॉ. शांतीलाल धनजी देवसी कला महाविद्यालय आणि वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय, वाडा, जि. पालघर.*

*Scholarly ResearchJournal's is licensed Based on a work at www.srjis.com*

लेखक निळू दामले यांनी 'टेली वर्तन : भारतीय संस्कृतीवर टेलिव्हिजनचा परिणाम' हा ग्रंथ सन २००० मध्ये लिहिला. डेविड पेज यांच्या संकल्पनेतून ग्रंथ आकारास आला आहे. भारत, श्रीलंका, नेपाळ, बांगलादेश आणि पाकिस्तान या देशात सॅटेलाइट टीव्हीचा काय परिणाम झाला हे तपासण्याच्या उद्देशाने डेव्हिड पेज त्यांनी काही मंडळींना एकत्र आणले. वरील देशांप्रमाणे भारतातील गुजराती, पंजाबी, बंगाली, तमिळ अशी प्रांतीय मंडळीही कार्यरत झाली. निळू दामले यांनी महाराष्ट्र व उत्तर प्रदेशची जबाबदारी स्वीकारली.

भारतीय संस्कृतीवर टेलिव्हिजनचा परिणाम कोणत्या स्वरूपाचा आहे, याचा शोध घेण्यासाठी लेखकाने आर्थिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक व राजकीय अंगाने विचार केलेला दिसून येतो. सदर संशोधनासाठी लेखकाने महाराष्ट्रातील मराठवाड्यातून प्रारंभ केला आहे. मराठवाडा हा भौगोलिकदृष्ट्या मागासलेला प्रदेश म्हणून ओळखला जातो. म्हणूनच लेखकाने तो भाग संशोधनासाठी निवडलेला असावा, असे वाटते. उदगीर तालुक्यातील एकुरका गाव, उदगीर व लातूर शहर, तर उत्तर प्रदेशातील मुंशी प्रेमचंद यांचे जन्मगाव लमई, चीरई गाव, (ब्लॉक), काशी, वाराणसी, बनारस इत्यादी ठिकाणी जाऊन लेखकाने आपली भूमिका लोकांपुढे मांडली आहे. विषयानुसार शोध घेत असताना लेखकाने समाजातील अतिशय सामान्य माणसांपासून ते शंकराचार्य, माजी लोकसभा अध्यक्ष शिवराज पाटील – चाकूरकर, प्राचार्य ना. य. डोळे, प्राचार्य अनिरुद्ध जाधव, उपप्राचार्य मनोहर हिरांबे, प्रा. गावडे, प्रा. सूर्यनारायण रणसुभे, प्रा. अनजान, डॉक्टर देवधर, डॉ. वर्षा पाटील, लमईतील श्रीवास्तव, पंडित किशन महाराज, बेरी, डॉक्टर सतीश कुमार, अतुल देऊळकर, जीवनधर शहरकर, पत्रकार जमाल इत्यादींच्या भेटी घेऊन चर्चा केली आहे. लेखकाने आपल्या भटकंतीत टीव्हीचा समाजजीवनावर झालेल्या परिणामांचा शोध घेताना संबंधित ठिकाणचे वातावरण, लोकसंख्या, एकूण घरे, सिंचन व्यवस्था, पिकं आदींचाही विचार केलेला दिसतो. शेवटी "उंबरठ्यावर" या सदर ग्रंथातील लेखात लेखकाने आपल्या प्रतिक्रिया नोंदविल्या आहेत.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

भारतीय संस्कृती ही प्राचीन संस्कृती आहे. तिला हिंदू धर्माचे अधिष्ठान आहे. वेगवेगळ्या कालखंडात आपल्या भारत देशावर अनेक परकीयांनी साम्राज्यवादी, धर्मप्रसाराच्या भूमिकेतून आक्रमणे केली. तरीही आपल्या संस्कृतीचा पाया अढळ आहे. एकोणिसाव्या शतकापासून आपल्या देशाचे आंतरराष्ट्रीय संबंध मोठ्या प्रमाणावर प्रस्थापित झाले आहेत. आज टेलिव्हिजन या प्रसारमाध्यमांमुळे तर जगातील सर्वच देश एकमेकांशी खूपच जवळ आले आहेत. याला भारत देशाही अपवाद नाही. टेलिव्हिजन हे दृश्य व श्राव्य प्रसार माध्यम आहे. त्याचा मानवी जीवनावर झपाट्याने परिणाम होताना दिसतो. पण हा होणारा परिणाम आपली सांस्कृतिक मुल्ये जोपासणारा आहे, कि ऱ्हास घडवून आणणारा आहे याचा विचार समाजातील जाणकार लोक करताना दिसतात. टीव्ही विषयक भारतातील समाजाच्या प्रत्येक स्थरातून अनुकूल व प्रतिकूल अशा दुहेरी स्वरूपात उमटणाऱ्या प्रतिक्रियांचा शोध घेण्यासाठी निळू दामले यांनी जी भटकंती केली त्यातून हा शोधग्रंथ लिहिला आहे.

लेखकाने आपल्या शोधयात्रेस फारच चिकित्सक दृष्टीने प्रारंभ केलेला दिसतो. सदर ग्रंथात लहान मुले, महाविद्यालयीन विद्यार्थी-विद्यार्थिनी, ग्रामीण व शहरी जीवन जगणारे स्त्री-पुरुष, धार्मिक, शैक्षणिक, राजकीय, साहित्य, संगीत, वैद्यकीय व पत्रकारिता क्षेत्रातील जाणकारांचा विचार केलेला दिसतो. सदर ग्रंथात टीव्ही, एकुरका, उदगीर, लातूर, लमई, चिरई, काशी – वाराणसी- बनारस, उंबरठ्यावर इत्यादी लेख आहेत. टीव्ही या पहिल्या लेखात भारताची लोकसंख्या, एकूण घरे, टीव्ही रंगीत टीव्ही, केबल जोडणी, टीव्ही चे भारतात आगमन, टीव्ही बाबत शासकीय धोरण देशातील सामाजिक व राजकीय स्थिती आदींचा आढावा घेतला आहे. लेखकाच्या म्हणण्यानुसार भारताची लोकसंख्या ९० कोटी असून १५ कोटी घरी आहेत. त्यापैकी दहा कोटी घरे शहरात आहेत व पाच कोटी खेड्यात. शहरातील चार कोटी घरांमध्ये रंगीत टीव्ही आहेत. मुंबई, कलकत्ता या शहरात केबल जोणी जास्त प्रमाणात आढळते. तर लातूर, सांगली परिसरात कमी प्रमाणात आढळते. ग्रामीण लोकसंख्येपैकी आठ कोटी घरांमध्ये टीव्हीचे कार्यक्रम पाहिले जातात.

१९७० च्या सुमारास टीव्हीने भारतात प्रवेश केला. १९९० पर्यंत टीव्ही भारतातल्या प्रत्येक भागात झपाट्याने पोहोचला. भारत सरकारने "टीव्हीच हे चैनीचं साधन आहे," हा विचार सोडून दिल्याने भारतात आज अनेक कंपन्यांचे टीव्ही उपलब्ध होताना दिसतात. टीव्हीद्वारे राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय आर्थिक, सामाजिक, राजकीय, धार्मिक, शैक्षणिक, सांस्कृतिक घडामोडी पहायला मिळतात. मनोरंजन आणि माहिती अशा गोष्टींची भूकही वाढलेली आहे. चित्रपटांबरोबरच जाहिरातीही मोठ्या प्रमाणात पाहायला मिळतात. पण पाहणाऱ्यांनपैकी काही लोक टीव्ही वाईट आहे, असे म्हणतात. टीव्हीचा समाजावर घातक परिणाम होतोय, असं सांगतात, तर काही लोक कार्यक्रम पाहण्यात रंगत असतात. टीव्हीला विरोध करणाऱ्यांची मनोभूमिका कोणती आहे व टीव्हीकडे सकारात्मक दृष्टीने पाहणाऱ्यांचे विचार कसे आहेत, हे सदर ग्रंथातील उर्वरित लेखांमधून पहायला मिळते.

टीव्हीचा लहान मुलांवर विपरीत परिणाम होतो असे काही जाणकारांचे म्हणणे सदर ग्रंथ पाहायला मिळते. लहान मुले टीव्हीमुळे अभ्यास करत नाहीत, दोन ते पाच तास टीव्ही पाहतात; चित्रपट पाहून प्रेमपत्र लिहितात, टीव्हीतील खाद्यपदार्थ व इतर वस्तूंच्या जाहिराती पाहून ते घेण्याचा हट्ट आई-वडिलांकडे करतात. तर गरीब

Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies

कुटुंबातील काही मुलं मालिकांमध्ये आणि सिनेमांमध्ये श्रीमंती पहातात, त्यांना चैन करावीशी वाटते, त्यामुळे ते गुन्हे करतात. 'जय हनुमान' या मालिकेत हनुमानाने पर्वत वाहून नेल्याचे अवास्तव चित्रण दाखवले जाते, त्यामुळे मुलांना वस्तूस्थीतीचे ज्ञान होत नाही. लहान मुलांनी टीव्ही पाहिल्याने होणाऱ्या परिणामांविषयी लातूर येथील मानसोपचार तज्ञ डॉ. वर्षा पाटील म्हणतात, "एक्झिटस सिड्रोम त्यांच्यामध्ये दिसतो. त्यांना चिंता वाटते. ती घाबरतात. भीतीदायक "हॉरर शो" यांचा त्यांच्यावर नकळत परिणाम होतो. भुतखेतं त्यांच्या मनात जाऊन बसतात. त्याचा थेट परिणाम दिसत नाही. आत्मविश्वासावर परिणाम होतो. परीक्षेत नीट लिहिता न येणं, अभ्यास न होण, लक्षात न राहण, असे दोष निर्माण होतात."

आजच्या युवा पिढीवर तर टीव्हीचा दीर्घ परिणाम होतोय, असे सदर ग्रंथावरून पाहायला मिळते. टीव्हीवरील मालिका व चित्रपट पाहून मुली त्याच पद्धतीचे पोशाख करण्याचा प्रयत्न करतात. प्रामुख्याने समाज्यातील वरच्या वर्गातील मुली उत्तान कपडे घालतात, असं काहीच म्हणणं आहे. तर मुले टीव्ही पाहून हिरोच्या पोशाख पद्धतीचे, हेअर स्टाईलचे, आवाजाचे अनुकरण करतात. लेखकाला हे चित्र उदगीरच्या संजय नगर झोपडपट्टीत आढळते. "ज्या घरात शिक्षण नाही त्या घरात टीव्ही मालिकांचे दुष्परिणाम होतात, मुलं दारू पितात, मुलीवर अतिप्रसंग करतात. टीव्हीवर चंगळवादाची चलती आहे," असे पत्रकार जीवनधर शहरकर (लातूर) यांचे मत आहे. बनारस येथील महाविद्यालय विद्यार्थी व सुशिक्षित बेकार तरुण व्यसनाधीनता व गुन्हेगारीकडे झुकलेले आहेत, हे सदर ग्रंथातून पाहायला मिळते.

टीव्हीमुळे शहरी व ग्रामीण स्त्रियांची व तरुणींची सौंदर्यविषयक कल्पना बदलली आहे. असे काही जाणकारांचे म्हणणे आहे. ग्रामीण स्त्रिया दूरदर्शन वरील सौंदर्य विषयक कार्यक्रम पाहून चेहरा आकर्षक करून घेण्यासाठी ब्युटी पार्लरमध्ये जातात. आर्थिकदृष्ट्या कमकुवत असलेल्या कुटुंबातील स्त्रिया व मुलींनाही ब्युटी पार्लरचे आकर्षण आहे. रेणुका शहाणे, डायना, सोनिया गांधी यांना टीव्हीने प्रसिद्धी दिल्याने ब्युटी पार्लर तेजीत चालतात असे आढळते.

संगीत महाविद्यालयातील विद्यार्थी टीव्हीतील जाहिराती व मालिका पाहून आपली स्वप्ने रंगवितात. 'वाह ताज,' ची जाहिरात करणारे 'झाकीर हुसेन,' 'सारेगमा, 'मेरी आवाज सुनो,' हे कार्यक्रम पाहून मुले महाविद्यालयात प्रवेश घेतात, असे लातूर - सावेवाडीतील बोरगावकर बंधूचे म्हणने आहे. तर बनारस येथील किशन महाराज म्हणतात, "बनारशी परंपरा ही शुद्ध भारतीय परंपरा आहे. ही परंपरा गुरु - शिष्य नात्यावर आधारलेली आहे. बनारसच्या संस्कृतीत संगीत आहे. गायक तयार व्हावा, संगीत परंपरा जतन व्हावी यासाठी टीव्हीने काहीही केलेले नाही."

टीव्हीचा परिणाम आर्थिक दृष्ट्या मागासलेल्या दलित कुटुंबावरही झालेला आहे, असे लेखकास आढळते. एकुरका गावातील प्रभू जाधव टीव्हीवर क्रिकेट पाहतो. आंघोळीसाठी साबण वापरतो. त्याची मुलगी शॅम्पू वापरते. तर लमई गावातील एक गरीब शेतकरीही साबण वापरतो. त्याची मुलगी गावात ब्युटी पार्लर नसल्याने पांडेपुरला जाते.

टीव्हीचा समाज जीवनावर होणाऱ्या या परिणामप्रमाणे आणखी काही प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे पाहण्यासारख्या आहेत.

"टीव्ही हे माध्यम काहीसं उथळ आहे. वर्तमानपत्र, साप्ताहिक, पुस्तक यामधून माणसाच व्यक्तिमत्त्व घडत. टीव्हीमुळे वाचन मागे पडू लागल आहे." "सतत टीव्ही पाहणे चूक आहे." "आज साऱ्या जगात दुःख आहे, हिंसा आहे. याचं कारण माणसांचा स्वतःवर ताबा राहिलेला नाही. टीव्हीमुळे हे घडत आहे." "----- टीव्ही मधून लोक जे पाहतात त्यामुळे आपली संस्कृती भ्रष्ट होत आहे. मालिका पाहिल्याने रामायण, महाभारतातील युद्ध व संघर्ष ही आजच्या गँगवार सारखा वाटतो. टीव्हीच्या प्रेक्षकांना महाभारततही मालिकातलीच माणसं दिसत असतील." टीव्ही प्रसार माध्यम व भ्रष्ट राजकारण्यांना खतपाणी घालते. "प्रेमचंद यांनी जी मूल्यं आमच्या समोर ठेवली ती मूल्यं हा टीव्ही नष्ट करतोय. तो लोकांना चैन करायला शिकवतोय." "एकूणच टीव्हीच्या एक्सपोझर मुळे स्त्रियांचे सौंदर्यदृष्टी बदलली आहे." "टीव्ही च्या नादात एक गोष्ट झालीय नवी पिढी कष्ट करायला तयार नाही." टीव्ही पाहण मूळात इस्लामविरोधी आहे. इस्लाममध्ये प्रतिमा चित्रित करण्याला मनाई आहे. इस्लामने करू नका म्हणून सांगितलेल्या सगळ्या गोष्टी टीव्हीवर असतात." "जस वातावरण असत तसच माणसाने वागावं. पश्चिमेत उघड सेक्स चालेलं भारतात मात्र चालणार नाही. कारण भारत ही एक वेगळी संस्कृती आहे."

अशाप्रकारे टीव्हीमुळे भारतीय संस्कृतीवर होणाऱ्या दुष्परिनामाविषयी व्यक्त केलेल्या प्रतिक्रिया विविध स्वरूपाच्या आहेत. पण काही जाणकारांनी टीव्ही प्रसारमाध्यमांपासून समाजात होणारे फायदे, घडून येणारे संस्कार आदींचा विचार केला आहे. त्यापैकी काही प्रतिक्रिया पुढीलप्रमाणे पाहूया.

" सगळाच टीव्ही वाईट असतो असं नाही, मलेरिया निर्मूलन, कुटुंब नियोजन, पाणी शुद्ध प्या इत्यादी गोष्टी टीव्ही सांगतो. देशभक्ती शिकवतो." "माझी सेक्सच्या सिंह बद्दल तक्रार नाही. खरं म्हणजे मला ते आवडतात. त्यात वाईट काय आहे? माणसाला फ्रीडम पाहिजेच." "टीव्हीचा अलीकडच्या काळातील मोठा फायदा असा की जगभरच्या घटना कळतात. रशियात झालेले बदल आम्हाला वर्तमानपत्रातून कळले नसते. बीसीसीने आम्हाला ते छान दाखविले." ज्या गावात वर्तमानपत्रही जात नाहीत तिथे एक टीव्ही असला तरी साऱ्या गावाला तो वस्तूंची माहिती देत असतो. हा फरक महत्त्वाचा आहे." "चित्रपटातील काही हिरो तगडे असतात त्याचही मुलं अनुकरण करून तब्येत सुधारण्याचा प्रयत्न करतात." "मला वाटतं की टीव्ही आधुनिक तंत्रज्ञान ही एक शक्तिशाली प्रेरणा आहे. तिचा परिणाम झाल्याशिवाय राहणार नाही. तो परिणाम कसा असेल हे मात्र सांगता येणार नाही - शिवराज पाटील – चाकूरकर." "------केस कापण यामध्ये भारतीय संस्कृती भ्रष्ट होते असे येणार नाही. पुर्वी काय होतं त्यावरून तसंच वागायचं ठरवलं तर माणसाला पुढे जाताच येणार नाही---.

सौंदर्या आणि श्रृंगार या गोष्टी खरं म्हणजे भारतीय संस्कृतीमध्ये पूर्वापारपासून चालत आहेत. खजुराहोच्या गुहांमध्ये शिल्प काय दाखवतात? ती भारतीय संस्कृतीच आहे ना." टीव्ही अगदीच वाईट आहे असं माझं म्हणणं नाही. त्याचा नीट उपयोग केला पाहिजे. केवळ धर्म व नीती सांगण्यासाठी टीव्ही वापरला पाहिजे – शंकराचार्य."

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

वरील प्रमाणे भारतीय संस्कृतीवर टीव्हीचा पडलेला प्रभाव सदर ग्रंथातून पाहायला मिळतो. लेखकाने हा ग्रंथ शारीरिक कष्ट सोसून चिकित्सक पद्धतीने लिहिला आहे. आपल्या भटकंतीत आलेले चांगले - वाईट अनुभव, भेटलेल्या मान्यवर व सामान्य व्यक्तींनी व्यक्त केलेले टीव्ही संबंधी विचार, आदींच्या अनुशंगाने लेखकाने आपली मनोभूमिका ही मांडलेली दिसते. लेखक लिहितात, "सेटलाईट टेलिव्हिजनन भारत नव्हे तर सार जगच बदललं आहे. माणसाच्या वाटचालीत एक महत्त्वाचा टप्पा सेटलाईट टेलिव्हिजनन हा आहे. उद्या, परवा, तेरवा भारत कसा असेल, भारतीय संस्कृती व माणसं कशी असतील ते मला सांगता येत नाही. पण मला आज प्रभू जाधव दिसतो, वाराणशी, लातूर, लमईतली माणसं दिसतात. त्याच्या वागण्यावरून हा देश मोठ्या बदलाच्या उंबरठ्यावर उभा आहे एवढेच दिसतं." लेखकाच्या या भूमिकेतून त्याला टीव्ही या प्रसार माध्यमाद्वारे समाज परिवर्तन अपेक्षित आहे, असे वाटते.

एकूण १४४ पृष्ठांच्या या ग्रंथात विजय तेंडुलकर यांची प्रस्तावना आहे. त्यांनी आपल्या प्रस्तावनेत लेखकाला हाती घेतलेल्या उपक्रमाबद्दल रस्त्यावरचा समाजशात्रज्ञ म्हटले आहे. सदर ग्रंथास लेखकाने आकर्षक असे मुखपृष्ठ योजिले आहे. मुन्शी प्रेमचंद यांच्या लमई या जन्म गावातील एका घरात लहान मुले व स्त्रिया टीव्ही पाहत असल्याचे छायाचित्र आहे. टीव्ही पाहणाऱ्यापैकी काही मुले व स्त्रिया घरातील जागेअभावी बाहेर बसलेली दिसतात. सदर मुखपृष्ठावरुन लेखकाला जणू असे सुचवायचे आहे की, टीव्ही खेडेगावातील आर्थिक दृष्ट्या नाजूक परिस्थिती असलेल्या कुटुंबात पोहोचला आहे. त्या कुटुंबातील एक सदस्य म्हणून आपला प्रभाव पाहणाऱ्यावर पाडत आहे. मुखपृष्टाप्रमाणेच संदर्भानुसार आणखी काही छायाचित्रंणे सदर ग्रंथात पाहायला मिळतात. लेखकाने ग्रंथासाठी योजिलेले शीर्षकही समर्थक आहे, असे मला वाटते. मुखपृष्ठाच्या आतील बाजूस लेखकाने १९६९ सालापासून आजपर्यंत समाजप्रबोधनाच्या भूमिकेने केलेली वाटचाल दर्शवली आहे. त्यातून पत्रकार, संशोधन, संपादन, छायाचित्रण, टीव्ही मालिकांची निर्मिती, साहित्यनिर्मिती असे लेखकाचे विविधांगी संपन्न व्यक्तिमत्व पाहायला मिळते. ओघवती भाषाशैली, प्रभावी मांडणी, प्रश्न विचारण्याची पद्धत, प्रसंगानुसार लोकांशी संवाद साधण्याचे लेखकाचे कौशल्य इत्यादी वाड्मयीन वैशिष्टे सदर ग्रंथात पाहायला मिळतात.

सदर ग्रंथाचे परीक्षण करताना काही ठळक बाबी वाचकांच्या नजरेस येतात. भारतीय संस्कृती हिंदू संस्कृती आहे, असे म्हटले जाते. पण भारतात बौद्ध, जैन, मुस्लिम व ख्रिस्ती धर्मियांचेही वास्तव्य अनेक शतकापासून मोठ्या प्रमाणात आहे. त्यांची धर्मविचारानुसार जगण्याची पद्धतीही स्वतंत्र आहे. टीव्ही हे प्रभावी प्रसार माध्यम आहे. त्याचा उपयोग भारतीय माणूस जाहिराती, मालिका, चित्रपट असे अनेक कार्यक्रम प्रदर्शित करण्यासाठी करवून घेतो. पण प्रदर्शित होणारे सर्वच कार्यक्रम जीवन उपयोगी असतात किंवा सर्वच कार्यक्रम टाकाऊ नसतात याची जाणीव होते. टीव्ही पाहताना दुष्परिणाम टाळण्यासाठी कोणत्या कार्यक्रमाना प्राधान्य द्यावे हे प्रत्येक कुटुंबाने ठरविणे गरजेचे आहे. 'संस्कुती म्हणजे काय?-----माणसाच जगण म्हणजे संस्कृती.' आज जग झपाट्याने बदलत आहे. हे बदलते जग आपली टीव्हीद्वारे आपण पहातोय. टीव्ही हे प्रसारमाध्यम पूर्णपणे सुशिक्षिताच्या, विचारवंतांच्या अधीन आहे. आपली प्राचीन सांस्कृतिक मूल्य अबाधित ठेवण्यासाठी व संस्कृतीवर

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*

होणारा दुष्परिणाम टाळण्यासाठी या प्रसार माध्यमाचा उपयोग समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन म्हणून सुशिक्षित, विचारवंत व कलावंत यांनी विचार करणे गरजेचे आहे, असे सदर ग्रंथाचे परीक्षण करताना सांगावेसे वाटते.

**ग्रंथ :** टेली - वर्तन : भारतीय संस्कृतीवर टेलिव्हिजनचा परिणाम,

**लेखक :** निळू दामले,

**प्रकाशक :** अक्षर प्रकाशन, माटुंगा (पश्चिम) मुंबई १६.

*Copyright © 2020, Scholarly Research Journal for Interdisciplinary Studies*